मा. जिल्हाधिकारी, पालघर यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हा निर्यात प्रचालन समिती बैठक दि.१४.०२.२०२३ रोजी संपन्न् झालेल्या जिल्हा निर्यात प्रचालन समितीच्या बैठकीचे इतिवृत्त

---

दिनांक १४/०२/२०२३ रोजी दुपारी १२.३० वाजता पालघर जिल्हयासाठी निर्यात प्रचालन समिती बैठक मा. जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर, जिल्हा पालघर येथे मा. जिल्हाधिकारी, पालघर यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात आली होती. सदर बैठकीसाठी खालील प्रमाणे पदाधिकारी उपस्थित होते.

| क्र. | अधिकारी / सदस्य यांचे नांव | पदनाम |
|---|---|---|
| १ | Shri. Govind Maruti Bodake | Hon'ble Collector, Palghar |
| २ | Shri. Dinesh Patil | Dist. Agriculture Officer, Palghar |
| ३ | Shri. Dinesh Patil | Assistant Commissioner, Fisheries Dept., Palghar |
| ४ | Shri. Mukesh Chandran | Station Manager, Palghar |
| ५ | Shri. Soni | Station Manager, Palghar |
| ६ | Shri. Pranil Save | Chiku Cluster, Talasari |
| ७ | Shri. Sunil Akrekar | Fish Cluster, Vikramgad |
| ८ | Shri. Yadnesh Save | Chiku Exporter |
| ९ | Shri. Devendra Raut | Chiku Exporter |
| १० | Shri. Sailesh Raut | Chiku Exporter |
| ११ | Smt. V.B. Sone | General Manager, District Inds. Centre, Palghar |

श्रीमती व्हि.बी. सोने, महाव्यवस्थापक, जिउके पालघर यांनी District Export Action Plan यांचे सविस्तर सादरीकरण करुन चर्चा करण्यात आली. पालघर जिल्ह्याकरीता ODOP अंतर्गत चिक्कू उत्पादन व Marine Products हे दोन असल्याबाबत सभेस सांगितले तसेच चिक्कू प्रक्रिया उद्योगांस चालना मिळणेसाठी राज्य शासनाच्या समूह विकास योजनेंतर्गत मौजे ब्राम्हणगांव, पोष्ट बोर्डी ता. तलासरी जि. पालघर येथे व मरीन प्रोडक्ट्स उद्योगांस चालना मिळणेसाठी राज्य शासनाच्या समूह विकास योजनेंतर्गत ता. विक्रमगड, जिल्हा पालघर येथे सामायिक सुविधा केंद्र स्थापनेचे कामकाज सुरु करण्यांत आले असून या माध्यमातून उत्पादन व निर्यात वाढीसाठी प्रयत्न होणार असल्याने उद्योजकांनी या वस्तूचे उत्पादनासाठी पुढाकार घेण्याचे आवाहन केले. याबाबत उपस्थित फिश क्लस्टरच्या सदस्यासोबत मा. अध्यक्षांनी सविस्तर चर्चा केली.

मा. जिल्हाधिकारी, पालघर यांनी चिकू महासंघ व मत्स्यव्यसायिक यांचे म्हणने ऐकुन घेऊन नायगाव ते बोर्डी पर्यंत एकुण 13 रेल्वे स्थानकांवर चिकू व प्रक्रिया केलेले मत्स्य उत्पादने विक्रीसाठी भाडे तत्वावर रेल्वे स्टॉल उपलब्ध करुन देण्याबाबत संबंधित रेल्वे अधिकाऱ्यांना सुचना केल्या तसेच कोरोना काळात सुरु असणारी किसान रेल्वे पुन्हा एकदा सुरु करणे संबंधी रेल्वे अधिकारी व संघटनेच्या प्रतिनिधी समवेत चर्चा करण्यात आली व सदर सविस्तर प्रस्ताव संबंधित कार्यालयास अग्रेषित करणेबाबत निर्देश देण्यात आले.

मा. जिल्हाधिकारी, पालघर यांनी औद्योगिक क्षेत्रासाठी मरीन प्रॉडक्टस व कृषी प्रक्रियेंतर्गत चिकू उत्पादन या एक जिल्हा एक उत्पादन या निवड करण्यांत आलेल्या वस्तूंचे उत्पादनासाठी जिल्हयामध्ये मोठया प्रमाणात वाव असल्यामुळे उद्योजक/ उत्पादक यांनी सदर वस्तूंचे उत्पादनासाठी औद्योगिक गुंतवणूकीचे माध्यमातून प्रयत्न करुन या वस्तूंची जास्तीत जास्त निर्यातीवाढीसाठी प्रयत्न करण्यांचे आवाहन सर्व उपस्थित उद्योजक/ निर्यातदार व औद्योगिक संघटना यांना केले. चिक्कू उत्पादन व Marine Products बाबत data analysis - Export करणाऱ्या उद्योजकांची यादी या कार्यालयास सादर करण्याचे निर्देश मा. अध्यक्षांनी संबंधितांना दिले.

शेवटी श्रीमती व्हि.बी. सोने, महाव्यवस्थापक, जिउके पालघर यांनी सदरची बैठक संपन्न झाल्याचे जाहिर केले.

महाव्यवस्थापक, जिउकें पालघर
तथा
सदस्य सचिव, जिल्हा निर्यात प्रचालन समिती

मा. जिल्हाधिकारी, पालघर.
तथा
मा. अध्यक्ष जिल्हा निर्यात प्रचालन समिती